शिक्षक दिन

वर्ष - 9 । अंक -18 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

www.mahaenews.com । शुक्रवार, दि. 5 सप्टेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com



प्रदूषण घटण्याची अपेक्षा

राज्यातील ई-वाहनधारकांसाठी खुशखबर!

# तीन महामार्गांवर 100% टोलमाफी!

## सरकारचा पर्यावरणपूरक निर्णय राज्यभरात लागू!

। पुणे । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

राज्यातील आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरु झाली आहे. लोकसभा आणि विधानसभा निवडणूक ‘महायुती’ म्हणून लढलेले सत्ताधारी भारतीय जनता पार्टी, शिवसेना आणि राष्ट्रवादी अजित पवार गट स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक स्वबळावर लढण्यासाठी तयारी करीत आहेत. स्वबळावर निवडणूक लढली, तरी महापौर आणि महत्त्वाची पदे ही ‘महायुती’ म्हणून देण्यात येतील. “त्यामागे पक्ष संघटन वाढवणे आणि इच्छुकांना न्याय देणे” असे सूत्र आहे, अशी माहिती महायुतीमधील एका बड्या नेत्यांने “महाईन्यूज”शी खासगीत बोलताना दिली.




### महाराष्ट्र सरकारचा मोठा निर्णय; इलेक्ट्रिक वाहन वापराला प्रोत्साहन, खर्चात बचत

या निर्णयाचा राज्यातील अनेक इलेक्ट्रिक वाहनधारकांना फायदा होणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार सरकारने राज्यातील 3 महामार्गांवर सरकारने इलेक्ट्रिक वाहनांसाठी टोलमाफी दिली आहे.

केंद्र सरकार तसेच राज्य सरकार गेल्या अनेक वर्षांपासून इलेक्ट्रिक व्हेईकल वापरण्याला प्रोत्साहन देत आहे. याच निर्णयांचा एक भाग म्हणून महाराष्ट्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. या निर्णयाचा राज्यातील अनेक इलेक्ट्रिक वाहनधारकांना फायदा होणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार सरकारने राज्यातील 3 महामार्गांवर सरकारने इलेक्ट्रिक वाहनांसाठी टोलमाफी दिली आहे.

### कोणत्या वाहनांना टोलमाफी मिळणार?

राज्य सरकारचा हा निर्णय आता लागू झाला असून तीन महामार्गांवर इलेक्ट्रिक वाहनांना टोल म्हणून एकही रुपया द्यावा लागणार नाही. अनेक इलेक्ट्रिक वाहनधारकांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. राज्याचे परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी बाबत माहिती दिली आहे. मोटार व्हेइकल अॅक्ट 1958 अंतर्गत सरकारने हा निर्णय घेतला आहे. या निर्णयाअंतर्गत M2, M3 आणि M6 श्रेणीच्या चारचाकी इलेक्ट्रिक वाहनांना तसेच राज्य परिवहन महामंडळ (STU) आणि खासगी कंपन्यांच्या इलेक्ट्रिक बसेसना ही टोलमाफी लागू असेल. सरकारची ही टोलमाफी 22 ऑगस्ट 2025 रोजीपासून लागू झालेली आहे.

### सरकारचे मत काय?

सरकारच्या या निर्णयामुळे इलेक्ट्रिक वाहन असणाऱ्यांना प्रवास स्वस्त होणार आहे. या निर्णयामुळे इलेक्ट्रिक वाहन खरेदीला चालना मिळेल, असे सरकारचे मत आहे. यामुळे इलेक्ट्रिक वाहन निर्मिती उद्योगांनाही यामुळे चालना मिळणार आहे. या निर्णयामुळे पर्यावरणपुरक वाहनांतही वाढ होण्याची शक्यता सरकारने व्यक्त केली आहे. सरकारच्या या निर्णयाचे सर्वच स्तरातून स्वागत केले जात आहे. या एका निर्णयामुळे आता इलेक्ट्रिक वाहनधारकांचे हजारो रुपये वाचणार आहेत.

### तीन महामार्गांवर इलेक्ट्रिक वाहनांसाठी 100% टोलमाफी

राज्यातील इलेक्ट्रिक वाहनधारकांसाठी महाराष्ट्र सरकारने मोठा दिलासा देणारा निर्णय घेतला आहे. राज्यातील तीन प्रमुख महामार्गांवर इलेक्ट्रिक वाहनांसाठी शंभर टक्के टोलमाफी लागू करण्यात आली आहे. केंद्र आणि राज्य सरकारकडून गेल्या काही वर्षांपासून इलेक्ट्रिक वाहनांच्या वापराला प्रोत्साहन दिले जात आहे. या टोलमाफीमुळे वाहनधारकांचा खर्च कमी होईल तसेच ई-वाहनांचा वापर वाढेल, प्रदूषण घटेल आणि शाश्वत वाहतुकीला चालना मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे. या निर्णयामुळे इलेक्ट्रिक वाहनधारकांना केवळ आर्थिक दिलासा मिळणार नाही, तर राज्यात ई-वाहनांचा वापर अधिकाधिक प्रोत्साहित होऊन ग्रीन मोबिलिटी मिशनला वेग मिळणार आहे.

### इलेक्ट्रिक वाहन असल्याने काय फायदा होतो?

इलेक्ट्रिक वाहन वापरण्याचे अनेक फायदे आहेत. सर्वात महत्त्वाचे या वाहनांमुळे प्रदूषण कमी होते. तसेच इंधनाचा खर्चही कमी होतो. सर्वसामान्य वाहणांना चालवण्यासाठी पेट्रोल, डिझेलची गरज असते. तर दुसरीकडे इलेक्ट्रिक वाहनांना मात्र पेट्रोल, डिझेलची गरज नसते. ही वाहनं पर्यावरण पुरक असल्याचे म्हटले जाते. इलेक्ट्रिक वाहनांमुळे ध्वनीप्रदूषण, वायूप्रदूषण होत नाही. त्यामुळेच जास्तीत जास्त इलेक्ट्रिक वाहने वापरावीत असे आवाहन केले जाते.

**महापालिका प्रारुप प्रभागरचना**

## भाजप-राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात वाद

# प्रारुप प्रभागरचनेवर 318 हरकती!

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिकेने प्रसिद्ध केलेल्या प्रारुप प्रभागरचनेवर ३१८ हरकती आणि सूचना आल्या आहेत. शेवटच्या दिवशी २७६ हरकती आल्या. सर्वाधिक हरकती प्रभाग क्रमांक दहा मोरवाडी- -शाहूनगर-संभाजीनगर या प्रभागातून आल्या आहेत. प्रारूप प्रभागरचनेवरून भाजप आणि अजित पवार गटात वादाची ठिणगी पडली आहे. प्रारूप प्रभागरचनेत कोणताही बदल करू नये, अशी भूमिका भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी घेतली आहे, तर प्रभागरचना करताना सीमांचे उल्लंघन केल्याचा आरोप राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाने केला आहे.**

## शेवटच्या दिवशी हरकतींसाठी रांग



महापालिकेने २२ ऑगस्टला चार सदस्यीय पद्धतीने ३२ प्रभागांची प्रारूप रचना जाहीर केली. प्रारूप प्रभागरचनेचे नकाशे महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केले होते. प्रभाग रचनेवर बुधवारपर्यंत ४२ हरकती आल्या होत्या. शेवटच्या दिवशी हरकती नोंदविण्यासाठी रांग लागली होती. दुपारी तीन वाजेपर्यंत २७६ हरकती आल्या. १४ दिवसांत एकूण ३१८ हरकती आल्या आहेत. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या नेत्या, माजी महापौर मंगला कदम यांच्या मोरवाडी-शाहूनगर-संभाजीनगर या प्रभागाच्या रचनेवर सर्वाधिक म्हणजे ११५ हरकती आल्या आहेत. या प्रभागाची रचना करताना नैसर्गिक नाले, महामार्गाच्या सीमा तोडल्याची हरकत कदम यांनी घेतली आहे.त्या खालोखाल प्रभाग क्रमांक एक चिखली गावठाण-मोरेवस्ती या प्रभागाबाबत ९८, तर राष्ट्रवादी (अजित पवार) पक्षाचे शहराध्यक्ष योगेश बहल यांचा प्रभाग असलेल्या महेशनगर-संत तुकारामनगर-वल्लभनगर प्रभागाबाबत ३१ हरकती आल्या आहेत.नऊ प्रभागांच्या प्रारूप रचनेबाबत एकही हरकत आली नाही. त्यामध्ये प्रभाग क्रमांक ५, १३, १५, १६, १७, १८, २५, २७ आणि २८ या प्रभागांचा समावेश आहे.प्रारूप प्रभाग रचनेवर २०१७ मध्ये एक हजार ४३० हरकती आल्या होत्या. त्यामध्ये तळवडे, चिखली गावठाण, सोनवणे वस्ती, मोरेवस्ती या प्रभाग क्रमांक एकबाबत सर्वाधिक एक हजार २९९ हरकती आल्या होत्या. आगामी महापालिका निवडणुकीसाठी २०१७ चीच प्रभाग रचना कायम ठेवण्यात आली आहे. आता केवळ ३१८ हरकती आल्या आहेत.या हरकतींवर राज्याचे प्रधान सचिव प्रवीण दराडे सुनावणी घेणार आहेत. १२ सप्टेंबरपर्यंत सुनावणीची प्रक्रिया पूर्ण केली जाणार आहे. ८ ते १० सप्टेंबर दरम्यान हरकतीवर सुनावणी होणार आहे. हरकती, सूचनांवरील शिफारशी विचारात घेऊन १३ ते १५ सप्टेंबर दरम्यान अंतिम प्रभागरचना नगरविकास विभागाला सादर केली जाणार आहे. नगरविकास विभागाकडून प्रभाग रचना राज्य निवडणूक आयोगाकडे पाठविणार आहे. आयोगाकडून मान्यता मिळाल्यानंतर ३ ते ६ ऑक्टोबर या कालावधीत महापालिका आयुक्त अंतिम प्रभागरचना प्रसिद्ध करणार आहेत.सर्वोच्च न्यायालयाने १० मार्च २०२२ पूर्वीच्या प्रभाग रचनेनुसार निवडणूक घेण्याचे आदेश दिले असल्याचा दावा करून आगामी महापालिका निवडणुकीसाठी प्रभागरचनेत कोणताही बदल करू नये, अशी सूचना भाजपचे विलास मडिगेरी यांनी केली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाच्या वतीने प्रभाग रचना करताना सीमांचे उल्लंघन केल्याचा आरोप करून हरकती घेतल्या आहेत.प्रभाग रचनेवर ३१८ हरकती आल्या आहेत. अनेक हरकती एकसारख्याच आहेत. या हरकतींवर पुढील आठवड्यात सुनावणी घेण्यात येणार आहे.

### शेवटच्या दिवशी २७६ हरकती

महापालिकेने २२ ऑगस्टला चार सदस्यीय पद्धतीने ३२ प्रभागांची प्रारूप रचना जाहीर केली. प्रारूप प्रभागरचनेचे नकाशे महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केले होते. प्रभाग रचनेवर बुधवारपर्यंत ४२ हरकती आल्या होत्या. शेवटच्या दिवशी हरकती नोंदविण्यासाठी रांग लागली होती. दुपारी तीन वाजेपर्यंत २७६ हरकती आल्या. १४ दिवसांत एकूण ३१८ हरकती आल्या आहेत.

# गणेश विसर्जन मिरवणुकीचे वेध

## मानाच्या गणपती मंडळांची पथके निश्चित, कार्यकर्त्यांची लगबग

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**गेल्या आठ दिवसांपासून भक्तिभावाने गणेशाची सेवा केलेल्या कार्यकर्त्यांना आता वाजत-गाजत निघणाऱ्या वैभवशाली मिरवणुकीने गणरायाला भावपूर्ण निरोप देण्याचे वेध लागले आहेत. महात्मा फुले मंडई येथील लोकमान्य टिळक पुतळ्यापासून शनिवारी (६ सप्टेंबर) सकाळी साडेनऊ वाजता विसर्जन मिरवणुकीची सुरुवात होणार असून मानाच्या गणपती मंडळांची पथके निश्चित झाली .**



गणेश विसर्जनाच्या तयारीला वेग आला असून विसर्जन मिरवणूक थाटामाटात निघावी यासाठी कार्यकर्त्यांची लगबग सुरू झाली आहे.गेल्या आठ दिवसांपासून सुरू असलेल्या उत्सवाची वैभवशाली सांगता करण्याच्या उद्देशातून वाजत-गाजत काढण्यात येणाऱ्या मिरवणुकीने गणरायाला शनिवारी निरोप देण्याची जय्यत तयारी कार्यकर्त्यांकडून सुरू झाली आहे. राज्य शासनाने गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा दिल्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये अमाप उत्साह आहे.पुण्याचे ग्रामदैवत आणि मानाच्या पहिल्या श्री कसबा गणपतीची मिरवणूक पारंपरिक पद्धतीने सकाळी साडेनऊ वाजता पालखीतून निघणार आहे. उपमुख्यमंत्री व पालकमंत्री अजित पवार, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील आणि खासदार मुरलीधर मोहोळ उपस्थित राहणार असून मिरवणुकीत दोन ढोल-ताशा पथकांचा सहभाग आणि गणेशोत्सवाची माहिती देणारा विशेष रथ असेल.जोगेश्वरी मंडळाची मिरवणूक दरवर्षीप्रमाणे पारंपरिक पद्धतीने पालखीतून निघणार आहे. श्री गणराय विराजमान असलेली चांदीची पालखी कार्यकर्ते आपल्या खांद्यावरून वाहून नेणार आहेत.

### गुरुजी तालीम मंडळ

मिरवणुकीत ढोल-ताशा पथकांचे वादन होणार आहे.फुलांनी सजविलेल्या ‘हर हर महादेव’ रथातून श्री गुरुजी तालीम मंडळ या मानाच्या तिसऱ्या गणपतीची मिरवणूक निघणार आहे. सुभाष सरपाले आणि स्वप्निल सरपाले यांनी हा रथ साकारला आहे. नगारा वादनाचा गाडा मिरवणुकीच्या अग्रभागी असून ढोल-ताशा पथकांचे वादन होणार आहे.

**शिक्षक दिनाच्या पूर्वसंध्येला** महापालिका शिक्षकांसाठी आनंदाची बातमी!

# 172 शिक्षकांना निवड, 78ना वरिष्ठ श्रेणी; मुख्याध्यापकांना पदोन्नती!

## आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्यला मोठे यश

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**शिक्षक दिनाची पूर्व संध्या पिंपरी-चिंचवड महानगरपालिका शिक्षण विभागाच्या प्राथमिक शिक्षकांसाठी आनंदाची ठरली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेले निवड श्रेणी, वरिष्ठ श्रेणी व मुख्याध्यापक पदोन्नतीचे आदेश अखेर निर्गमित केले असून, १७२ शिक्षकांना निवड श्रेणी, ७८ शिक्षकांना वरिष्ठ श्रेणी आणि अनेक पात्र शिक्षकांना मुख्याध्यापक पदोन्नतीचे आदेश दिले आहेत. आयुक्त शेखर सिंह यांच्या या निर्णयामुळे शिक्षकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.**




दरम्यान, समाजाचे भविष्य घडवणाऱ्या, आदर्श पिढी निर्माण करणाऱ्या गुरुजनांच्या पदोन्नतीचा विषय मंजूर व्हावा यासाठी भाजपाचे आमदार महेश लांडगे यांनी पाठपुरावा केला होता. या पाठपुराव्याला यश आले आहे. हे शहरातील तमाम गुरुजनांना वंदन आहे, असे आमदार लांडगे म्हणाले.

महापालिका क्षेत्रातील शिक्षकांच्या विविध मागण्यांसाठी पदवीधर शिक्षक संघटनेच्या वतीने सातत्याने पाठपुरावा केला जात होता. याच अनुषंगाने पाठपुरावा करत राज्य शासनाच्या निर्णयानुसार निवड व वरिष्ठ श्रेणीचे आदेश महापालिका आयुक्त यांच्या अधिकार क्षेत्रातच देण्यात यावेत अशी मागणी केली होती. दरम्यानच्या काळात शिक्षण संचालक शरद गोसावी यांच्या स्वाक्षरीने राज्यातील सर्व महानगरपालिका शिक्षकांना वरिष्ठ व निवड श्रेणीचे आदेश महापालिका आयुक्त स्तरावरच देण्यास मान्यता देण्यात आली.

यानुसार, पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त यांच्या आदेशाने पदोन्नती समितीच्या स्वाक्षऱ्या घेऊन शिक्षक दिनाच्या पूर्वसंध्येला सर्व आदेश निर्गमित करण्यात आले.

या निर्णयामुळे शिक्षक वर्गात मोठा आनंद आणि समाधान व्यक्त करण्यात येत आहे. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लागल्याने शिक्षकांच्या हक्कांची लढाई यशस्वी झाली आहे.

> “ शिक्षक दिनाच्या पूर्वसंध्येला आलेल्या या निर्णयामुळे शिक्षकांचा सन्मान अबाधित राखला गेला असून, त्यांच्या योगदानाला शासनाने मान्यता दिली आहे. भविष्यातही शिक्षकांच्या हक्कांसाठी अशीच सकारात्मक भूमिका घेतली जाईल. पिंपरी-चिंचवड महापालिका क्षेत्रातील पालिकांच्या शाळांमध्ये शिक्षणाचा स्तर उंचावण्याचे काम शिक्षकांनी केलेले आहे. महापालिकेचे अनेक विद्यार्थी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकत आहेत. शहरातील एक विद्यार्थिनी सातासमुद्रापार फेलोशिप घेऊन शिकायला जाणार आहे. हे महापालिकेचे यश आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या यशासाठी अहोरात्र धडपड करणाऱ्या शिक्षकांना यथोचित सन्मान देणे आपले कर्तव्य आहे.
> **-महेश लांडगे,** आमदार, भाजपा, पिंपरी -चिंचवड, पुणे.

---

# वायसीएम व तालेरा रुग्णालयात अत्याधुनिक सुविधा सुरू

## ट्रायेज, पुनर्जीवन व डायलिसीस केंद्रामुळे आरोग्य सेवांना नवे बळ

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयात आपत्कालीन विभागासाठी ट्रायेज व पुनर्जीवन सुविधा सुरू करण्यात आल्या आहेत, तर तालेरा रुग्णालयात अत्याधुनिक डायलिसीस केंद्राचे उद्घाटन झाले आहे.**




दाना टीएमफोर इंडिया कंपनीने सामाजिक दायित्व निधी (सीएसआर) उपक्रमांतर्गत या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. दाना टीएम फोर इंडियाचे प्रकल्प प्रमुख शिवाजी निळकंठ, प्रशासन विभागाच्या प्रमुख योगिता सुषीर यांच्यासह डॉक्टर, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. ट्रायेज सुविधेमुळे रुग्णांच्या प्रकृतीच्या स्थितीनुसार जलद मूल्यमापन आणि प्राधान्यक्रम ठरविणे शक्य होईल. पुनर्जीवन सुविधेमुळे आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यास मदत होईल. गंभीर रुग्णांना जलद, प्रणालीबद्ध आणि उच्च गुणवत्तेची सेवा देण्यासाठी या सुविधा उपयुक्त ठरणार आहेत. ट्रायेज व पुनर्जीवन या सुविधा उपलब्ध झाल्यामुळे तातडीच्या वैद्यकीय उपचारांची आवश्यकता असलेल्या रुग्णांची सेवा करण्याच्या रुग्णालयाच्या क्षमतेत वाढ होईल, असा विश्वास वायसीएमचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र वाबळे यांनी व्यक्त केला.

तालेरा रुग्णालयात अत्याधुनिक डायलिसीस केंद्र

महापालिकेच्या तालेरा रुग्णालयात नवीन डायलिसीस केंद्र उभारण्यात आले आहे. या केंद्रासाठी फियाट इंडिया ऑटोमोबाईल्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीने सामाजिक दायित्व निधीतून आठ डायलिसीस मशिन अत्याधुनिक खाटांसह दिल्या आहेत. डायलिसीस केंद्रामुळे मूत्रपिंड विकारग्रस्त रुग्णांना मोठा दिलासा मिळेल. त्यांना जवळच मिळणाऱ्या या सुविधेमुळे धावपळ कमी होण्यास मदत होईल, असे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी सांगितले.

रुग्णांना मिळणाऱ्या सुविधा

अत्याधुनिक डायलिसीस मशीन, प्रशिक्षित डॉक्टर व तज्ज्ञ तंत्रज्ञांची उपलब्धता. प्रत्येक रुग्णासाठी स्वतंत्र व स्वच्छ खाटांची सोय, आपत्कालीन उपचारासाठी आवश्यक वैद्यकीय सुविधा, निर्जंतुकीकरण आणि स्वच्छतेची काटेकोर काळजी, रुग्णांच्या सोयीसाठी आरामदायी, हवेशीर व सुरक्षित वातावरण, उद्वाहक (लिफ्ट)ची व्यवस्था असणार आहे.

> “ महापालिका गेल्या काही वर्षांत आरोग्य सेवेत सातत्याने सुधारणा करत आहे. तालेरा, जिजामाता व आकुर्डी रुग्णालयात नव्या डायलिसीस केंद्रांची भर पडल्याने आरोग्य सेवांच्या उपलब्धतेत आणखी वाढ झाली. तालेरा रुग्णालयातील हे डायलिसीस केंद्र नागरिकांना दिलासा देणारे ठरणार असून महापालिकेच्या 'सर्वांसाठी आरोग्य' या संकल्पनेला बळकटी देणार आहे.
> **-विजयकुमार खोराटे,** – अतिरिक्त आयुक्त, पिंपरी-चिंचवड महापालिका



## भूमिका

# राजकीय विरोधक संपवायचे आहेत

**तीस दिवसांपेक्षा जास्त काळ कोणत्याही 'गंभीर' आरोपांसाठी न्यायालयीन कोठडीत राहिल्यानंतर पंतप्रधान, मुख्यमंत्री आणि इतर मंत्र्यांना बडतर्फ करण्यासाठी संविधान दुरुस्ती विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे पाठवले गेले. येत्या हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्याच आठवड्यात त्यांना आपला अहवाल सादर करावा लागेल.**

त्यानंतर हे विधेयक मंजूर करण्याची प्रक्रिया सुरू होईल, पण सरकारसाठी हे विधेयक मंजूर करणे सोपे होईल की याबाबत प्रखर विरोधामुळे सरकारला विधेयकपासून माघार घ्यावी लागेल हे पुढील अधिवेशनातच कळेल. या विधेयकाच्या प्रस्तावाभोवती समर्थनाची आणि विरोधाची तीव्र लाट उसळली आहे. कुणी याला लोकशाहीतील नैतिकता टिकवण्याचे साधन म्हणत आहे, तर कुणी याला केंद्र सरकारचा राजकीय सूडबुद्धीचा प्रयत्न म्हणून पाहात आहे.सरकारमार्फत संसदेमध्ये २० ऑगस्ट रोजी याबद्दलचे '१३० वी घटनादुरुस्ती विधेयक' मांडताना, 'देशातील राजकारण स्वच्छ आणि नैतिकताधारित करण्याच्या उद्देशाने हे विधेयक सादर होते आहे' असे सांगण्यात आले. लाचखोरी आणि इतर गंभीर गुन्ह्यांच्या आरोपांसाठी पंतप्रधान, मुख्यमंत्री किंवा इतर



मंत्र्याना जर सलग ३० दिवस न्यायालयीन कोठडीत काढावे लागले, तर त्यांची पदावरून आपोआप हाकालपट्टी करण्याची तरतूद या घटनादुरुस्तीत आहे. या कायद्याचा गैरवापर होऊ शकतो ही विरोधकांची भीती आहे. एवढेच नव्हे तर 'इंडिया आघाडी'ने असा आरोप केला आहे की, विरोधी पक्षांची सरकारे असलेल्या राज्यात स्वत:ची सत्ता आणता यावी या हेतूने सरकारने हा कायदा केला आहे. या विधेयकाची खोलात जाऊन चर्चा करण्याआधी आजच्या संसदेतील सत्ताधाऱ्यांबरोबरच विरोधी बाकावरील खासदारांची संख्या लक्षात घ्यावी लागेल. संविधान दुरुस्ती विधेयक मंजूर करण्यासाठी संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये विशेष बहुमत आवश्यक असते. संविधानानेच अनुच्छेद ३६८ नुसार घटनादुरुस्तीसाठी दंडक घालून दिले आहेत,राज्यसभेत दोन पातळ्यांवर बहुमत आवश्यक आहे. एकूण सदस्यांचे बहुमत (म्हणजे सभागृहाच्या एकूण सदस्य संख्येच्या ५० टक्के पेक्षा जास्त) आणि दुसरे, उपस्थित व मतदान करणाऱ्या सदस्यांच्या दोन तृतीयांश बहुमत. सध्या लोकसभेत ५४२ सदस्य आहेत. किमान २७२ खासदारांनी (एकूण बहुमत) संसदेत हजर राहणे विधेयक मंजुरीसाठी आवश्यक आहे. शिवाय उपस्थित असलेल्या आणि मतदान करणाऱ्या दोन तृतीयांश खासदारांचा पाठिंबा आवश्यक आहे. म्हणजेच, सर्व ५४२ खासदार जर उपस्थित असतील तर विधेयक मंजूरीसाठी किमान ३६१ खासदार खासदार आवश्यक आहे. कार्यपालिका आणि न्यायपालिका या लोकशाहीच्या दोन स्तंभातील अधिकारांचा मुद्दाही या विधेयकामुळे चर्चेला आला आहे. कायदा करणे हे कार्यपालिकेचे म्हणजे सरकारचे काम; तर या कायद्यांनुसार एखादा आरोपी दोषी आहे किंवा नाही कसे हे ठरवणे हे न्यायालयाचे काम आहे. मात्र, या विधेयकामुळे न्यायालयाच्या अधिकारात सरकारचा अधिक्षेप होण्याची शक्यता आहे; कारण सत्तेतील व्यक्तींवर गुन्हेगारींचा निव्वळ आरोप झाला आणि त्यासाठी तीस दिवस संबंधित व्यक्तीस कोठडीत ठेवण्यात आले, तरीही तिला पदावरून हटावे लागेल. संबंधित व्यक्ती दोषी आहे की निर्दोष, याचा न्यायालयात निवाडा न होताच तिला पद गमवावे लागेल. संबंधित व्यक्ती गुन्ह्यात निर्दोष ठरल्यानंतर ती त्या पदावर परत जाऊ शकते, असे हे विधेयक म्हणत असले तरी न्यायदानाच्या प्रक्रियेला होत असलेला विलंब पाहता तिला कदाचित, न्यायालयात तिच्यावरील खटला उभा राहण्याआधीच, रीतसर आरोपपत्र दाखल होण्याच्याही आधीच पद सोडण्याची शिक्षा भोगावी लागेल असे दिसते. थोडक्यात, अशा प्रकरणात नैसर्गिक न्यायाचे तत्त्व नाकारले जाते आहे, असा प्रमुख आक्षेप आहे. वास्तविक गुन्हा सिद्ध झालेल्या लोकप्रतिनिधींच्या शिक्षेची वेगळी तरतूद असताना हे स्वतंत्र विधेयक आणण्याची गरज नाही. तरीही ते आणले गेले आहे.

## प्रासंगिक »

### सावली मिठी

***आरक्षणाची मर्यादा वाढवून घेणे आणि त्यावर न्यायालयाचे शिक्कामोर्तब मिळवणे, हा मार्ग निव्वळ राजकीय श्रेयवादासाठी टाळला जातो आहे...***

मराठा आरक्षणासाठी आझाद मैदानात मनोज जरांगे यांनी छेडलेल्या आंदोलनाने काय बदलले? आंदोलनासाठी मुंबईत येण्याआधी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा उल्लेख सातत्याने अवमानकारक शब्दांत करणारे जरांगे आंदोलनाच्या अखेरीस मुख्यमंत्र्यांना फडणवीस साहेब म्हणू लागले. इतकेच नाही. तर सरकारचा हेतू, प्रयत्न किती प्रामाणिक आहे याचेही प्रमाणपत्र ते देऊ लागले. सरकारच्या दृष्टीने ही या आंदोलनाची सर्वात मोठी फलश्रुती. सरकारविरोधात शड्डू ठोकणाऱ्यास प्रत्यक्षात काहीही न देता बरेच काही दिल्याचे समाधान मिळू देणे हे खरे कौशल्य. ते फडणवीस यांनी दाखवले. जरांगे यांस विजयाचा आनंद मिळू देण्यात सरकारचा महाविजय आहे. तो मिळवणे फडणवीस यांच्यासाठी आवश्यक होते. विशेषत: जरांगे यांचे आंदोलन हाताळण्यात सुरुवातीस दिरंगाई दाखवल्यानंतर अधिक वेळ दवडणे फडणवीस सरकारला परवडणारे नव्हते.

दरवर्षी रॅमन मॅगसेसे पुरस्कार आपल्याला आठवण करून देतो की एकेकट्या व्यक्ती किंवा संस्था यांनी केलेला एखाद्या कल्पनेचा पाठपुरावासुद्धा कुणा अवघ्या राष्ट्राचे भवितव्य बदलणारा ठरू शकतो. यावर्षी 'एज्युकेट गर्ल्स'या भारतीय संस्थेला मिळालेला पुरस्कार ग्रामीण बालिकांच्या शिक्षणाकडे आवश्यक असा प्रकाशझोत टाकतो.

# ग्रामीण मुलींच्या शिक्षणाची क्रांती पूर्ण

हा पुरस्कार जाहीर झाल्यानंतर विजेत्यांचे अभिनंदन जगभरातून होत असताना, भारताने थांबून आपल्या देशात अजूनही अपूर्ण असलेल्या परिवर्तनाचा विचार करणे गरजेचे आहे. 'मुलगी शिकली प्रगती झाली' या घोषणेचा अर्थ असा होता की प्रत्येक ग्रामीण मुलगी शाळेत जावी, तिथे टिकावी आणि चांगले शिकावी... पण प्रत्यक्षात काय झाले, याचे आत्मपरीक्षण आता तरी गरजेचे आहे.जगातील सर्वात मोठ्या शालेय शिक्षण प्रणालीपैकी एक म्हणून भारतातील शाळांकडे पाहिले जाते. सरकारी शाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा तसेच खासगी शाळा यांतून एकंदर २५ कोटींपेक्षा जास्त मुले शिकत आहेत. तरीही, विशेषत: ग्रामीण भागातील लाखो मुली माध्यमिक शिक्षण पूर्ण करण्याआधीच शाळा सोडतात ही वस्तुस्थिती आपण बदलू शकत नाही. कारणे परिचित आहेत : घरची गरिबी, पुरुषप्रधान किंवा पितृसत्ताक पद्धतीमुळे मुलीकडून घरकाम, लवकर लग्न अशाच अपेक्षा, जवळ शाळा नसणे आणि कधी



कधी शाळेत शौचालय नसण्यासारखी मूलभूत बाबसुद्धा.मुलीने घेतलेल्या प्रत्येक अतिरिक्त शैक्षणिक वर्षामुळे तिचे उत्पन्न १०–२० टक्क्यांनी वाढते. सर्व मुलींनी १२ वर्षांचे शिक्षण पूर्ण केले तर पुढील दशकात भारताचे सकल राष्ट्रीय उत्पादन (जीडीपी) जवळजवळ १० टक्क्यांनी वाढू शकते, हे लक्षात घेतले तर मुलींना शिक्षणातून वगळण्याची किती प्रचंड किंमत आपण मोजतो आहोत हे लक्षात येईल.

शिक्षित मुलगी लग्न उशिरा करते, तिची मुले अधिक निरोगी असतात, ती जास्त कमावते आणि आपले कुटुंब व समाज सशक्त करते. तिच्या शिक्षणाला नाकारणे हा केवळ तिच्यावरचा व्यक्तिगत अन्याय नाही- ते स्वतःच्या राष्ट्रावर केलेले घाव आहेत.मुलींनी शिकावे, यासाठी आपल्या देशात घडत असलेल्या बदलाचे एक प्रेरणादायी उदाहरण म्हणजे एज्युकेट गर्ल्स! ही संस्था सफीना हुसेन यांनी २००७ मध्ये स्थापन केली. त्या वेळी राजस्थानातील ५० गावांपासून सुरुवात करून ही संस्था आता ३०,००० हून अधिक गावांत पोहोचली असून २०लाखांहून अधिक मुली शाळेत शिकू शकतील, असे काम या संस्थेने केले आहे.'एज्युकेट गर्ल्स'ची कार्यपद्धती साधीच, पण प्रभावी आहे : तरुण मुला-मुलींना स्थानिक स्वयंसेवक म्हणून तयार करणे, जे घराघरात जाऊन कुटुंबांना पटवून देतात की मुलींनी शाळेत गेले पाहिजे! सफीना यांचे कार्य आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरवले गेले आहे. नुकतेच त्यांना WISE PRIZE FOR EDUCATION मिळाले असून त्या हा पुरस्कार मिळवणाऱ्या पहिल्या भारतीय महिला ठरल्या आहेत. सातत्य, डेटा आणि सामाजिक भागीदारी यांचे एकत्रीकरण झाल्यास काय घडू शकते हे त्यांच्या नेतृत्वाने दाखवून दिले आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

**नगरसेवक निलंबित** पक्षवविरोधी कारवाई करत असल्याचा आरोप

# भाजपचे सहा नगरसेवक पक्षातून निलंबित

## आ. राणे यांचा कारवाईवर आक्षेप

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ नगरपंचायतीत भाजप आणि शिवसेना यांच्यातील राजकीय संघर्ष आता समोर आला आहे. भाजप जिल्हाध्यक्ष प्रभाकर सावंत यांनी कुडाळमधील सहा भाजप नगरसेवकांना पक्षातून निलंबित केले आहे. या नगरसेवकांवर शिवसेना दरबारात वावरत असल्याचा आणि पक्षविरोधी कारवाया करत असल्याचा आरोप आहे. या घटनेमुळे महायुतीमधील वातावरण चांगलेच तापले आहे. दरम्यान आमदार निलेश राणे यांनी सिंधुदुर्ग जिल्ह्यात खासदार नारायण राणे भाजपचे निर्णय घेतात, त्यामुळे खासदार राणे यांची भूमिका महत्त्वाची आहे असे त्यांनी सांगितले.**



सहा नगरसेवकांना निलंबित केले आहे. या नगरसेवकांमध्ये नगराध्यक्ष प्राजक्ता बांदेकर, गटनेता विलास कुडाळकर, नगरसेवक अभिषेक गावडे, राजीव कुडाळकर, नयना मांजरेकर आणि चांदणी कांबळी यांचा समावेश आहे. हे सर्व नगरसेवक गेल्या काही महिन्यांपासून पक्षाच्या कोणत्याही कार्यक्रमात सहभागी होत नव्हते, असे प्रभाकर सावंत यांनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे. पक्षाने वारंवार सूचना देऊनही त्यांनी सहकार्य केले नाही, त्यामुळे त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. या सहा नगरसेवकांसह संध्या तेरसे आणि रामचंद्र परब या दोन नगरसेवकांनी 'सिद्धिविनायक नगर विकास आघाडी' हा गट स्थापन केला होता. मात्र, संध्या तेरसे आणि रामचंद्र परब हे पक्षाच्या धोरणांनुसार काम करत असल्यामुळे त्यांना गटातून वगळण्यात यावे, अशी मागणीही सावंत यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

भाजपच्या इतिहासात एकाच वेळी सहा नगरसेवकांना निलंबित करण्याची ही पहिलीच वेळ असल्याचे बोलले जात आहे.या निलंबनावर कुडाळ-मालवणचे शिवसेना (शिंदे गट) आमदार निलेश राणे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्यांनी समाजमाध्यमांवर याबाबत आपली भूमिका स्पष्ट केली आहे. "या पत्राला आम्ही किंमत देत नाही," असे त्यांनी म्हटले आहे. आमदार राणे यांच्या म्हणण्यानुसार, सिंधुदुर्ग जिल्ह्यात भाजपचे सर्व निर्णय खासदार नारायण राणे घेतात. जोपर्यंत नारायण राणे सांगत नाहीत, तोपर्यंत हे निलंबन मान्य केले जाणार नाही असे म्हटले आहे.आमदार निलेश राणे यांनी थेट भाजप जिल्हाध्यक्षांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केल्यामुळे भाजप-शिवसेना महायुतीमध्ये दुफळी निर्माण झाल्याचे स्पष्ट झाले आहे. एका बाजूला भाजप जिल्हाध्यक्ष पक्षशिस्त मोडल्यामुळे कारवाई करत आहेत, तर दुसऱ्या बाजूला आमदार निलेश राणे या कारवाईलाच विरोध करत आहेत. यामुळे भविष्यात भाजपची अधिकृत भूमिका काय असेल, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. हे सहा नगरसेवक शिवसेना आमदार निलेश राणे यांच्या जवळ गेल्याने, भाजपने त्यांच्यावर पक्षविरोधी कारवायांमुळे कारवाई केली. या घटनेमुळे कुडाळ नगरपंचायतीच्या राजकारणात मोठे बदल होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. भाजपने कुडाळ नगरपंचायतीच्या

सहा नगरसेवकांना निलंबित केले आहे. या नगरसेवकांमध्ये नगराध्यक्ष प्राजक्ता बांदेकर, गटनेता विलास कुडाळकर, नगरसेवक अभिषेक गावडे, राजीव कुडाळकर, नयना मांजरेकर आणि चांदणी कांबळी यांचा समावेश आहे. हे सर्व नगरसेवक गेल्या काही महिन्यांपासून पक्षाच्या कोणत्याही कार्यक्रमात सहभागी होत नव्हते, असे प्रभाकर सावंत यांनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे. पक्षाने वारंवार सूचना देऊनही त्यांनी सहकार्य केले नाही, त्यामुळे त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. या सहा नगरसेवकांसह संध्या तेरसे आणि रामचंद्र परब या दोन नगरसेवकांनी 'सिद्धिविनायक नगर विकास आघाडी' हा गट स्थापन केला होता.

### राणे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली

रामचंद्र परब हे पक्षाच्या धोरणांनुसार काम करत असल्यामुळे त्यांना गटातून वगळण्यात यावे, अशी मागणीही सावंत यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे. भाजपच्या इतिहासात एकाच वेळी सहा नगरसेवकांना निलंबित करण्याची ही पहिलीच वेळ असल्याचे बोलले जात आहे.या निलंबनावर कुडाळ-मालवणचे शिवसेना (शिंदे गट) आमदार निलेश राणे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

# जीआर सरसकट ओबीसी आरक्षणाचा नाही

## हैदराबाद गॅझेटबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे स्पष्टीकरण

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**हैदराबाद गॅझेट स्वीकारण्याबाबतचा 'तो' शासननिर्णय सरसकट कुणबी (ओबीसी) आरक्षणाचा नसून पुराव्यांसाठीचा आहे आणि त्याने ओबीसींवर कोणताही परिणाम होणार नाही, असे परखड प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी येथे केले. मंत्री छगन भुजबळ मी चर्चा केली असून त्यांची नाराजी दूर केली जाईल.**



मराठा व ओबीसी दोन्ही समाजांना बरोबर घेवून वाटचाल करायची आहे, असे फडणवीस यांनी नमूद केले.मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे यांच्या मागण्या मान्य करुन राज्य सरकारने जारी केलेल्या शासननिर्णयावरुन ओबीसी समाजात संतापाचे वातावरण आहे आणि मंत्री भुजबळही नाराज झाले आहेत. मराठा समाजातील नागरिकांना आता सरसकट कुणबी दाखले दिले जाणार, असा समज ओबीसी समाजामध्ये पसरला आहे. त्यामुळे फडणवीस यांनी त्या शासननिर्णयाचा अर्थ स्पष्ट केला आहे. भुजबळांना मी वस्तुस्थिती समजावून सांगितली असून ते नाराज नाहीत, असे फडणवीस यांनी नमूद केले. मराठा समाज महत्वाचा समाज असून राज्याच्या जडणघडणीत या समाजाचे मोठे योगदान आहे. मराठा समाजाचे कल्याण झालेच पाहिजे. काही लोक जाणीवपूर्वक गैरसमज निर्माण करीत आहेत, असे फडणवीस यांनी सांगितले. मराठवाड्यात निझामाचे राज्य होते व त्याचे पुरावे हैदराबादला मिळतात.ज्यांचा हक्क आहे, त्यांना आरक्षण मिळेल व कोणालाही खोटेपणा करता येणार नाही. भुजबळ किंवा इतर कोणालाही शंका असल्यास त्या दूर केल्या जातील.

### नागपूरमध्ये आंदोलन सुरु केले

एका समाजाचे काढून दुसऱ्या समाजाला देणार नाही. मराठ्यांचे मराठ्यांना आणि ओबीसींचे ओबीसींना देणार असून दोन्ही समाजांमध्ये दुरावा निर्माण होणार नाही, असे फडणवीस यांनी स्पष्ट केले.मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देण्यात येवू नये, अशी ओबीसी समाजाची मागणी असून त्यांनी गेल्या काही दिवसांपासून नागपूरमध्ये आंदोलन सुरु केले होते.

## भाजपच्या सदस्यांचे निलंबन

## मुख्यमंत्री बॅनर्जी यांच्या भाषणापूर्वी भाजप सदस्यांनी घोषणाबाजी

# पश्चिम बंगाल विधानसभेत गोंधळ!

### शंकर घोष दिवसभरासाठी निलंबित

।नवी दिल्ली। वृत्तसंस्था : महाईन्यूज

**पश्चिम बंगाल विधानसभेत गुरुवारी अभूतपूर्व गोंधळ झाला. सत्तारूढ तृणमूल काँग्रेस तसेच विरोधी भाजप सदस्य एकमेकांच्या अंगावर धावून गेले. या गदारोळात भाजपच्या पाच आमदारांचे निलंबन करण्यात आले. बंगाली स्थलांतरितांवरील अत्याचारांबाबतच्या ठरावावरून हा वाद झाला.**



मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या भाषणापूर्वी भाजप सदस्यांनी घोषणाबाजी केली. विरोधी पक्षनेते सुवेंदू अधिकारी यांचे २ सप्टेंबरला निलंबन करण्यात आले होते. त्याबाबतही भाजप सदस्यांनी घोषणा दिल्या. याला तृणमूल काँग्रेसच्या सदस्यांनी प्रत्युत्तर देत घोषणाबाजी केल्याने वातावरण चिघळले. विधानसभा अध्यक्ष बिमन बॅनर्जी यांनी भाजपचे मुख्य प्रतोद शंकर घोष यांना दिवसभरासाठी निलंबित केले. घोष यांनी सदनातून बाहेर जाण्यास नकार दिल्याने सुरक्षारक्षकांकरवी त्यांना बाहेर नेण्यात आले. यावरून वाद अधिक वाढला. या गोंधळातच भाजपच्या अग्निमित्रा पॉल, मिहीर गोस्वामी, ब या आमदारांना निलंबित करण्यात आले. दोन्ही बाजूंकडून घोषणाबाजी सुरू असल्याने सुरक्षारक्षक परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये म्हणून खबरदारी घेत होते. भाजप मला का बोलू देत नाही? असा प्रश्न ममतांनी विचारला. अनेक वेळा तृणमूलचे सदस्य भाजप सदस्यांवर धावून गेले तेव्हा सुरक्षारक्षकांनी रोखले. या गोंधळात विधानसभा अध्यक्षांनी कामकाज सुरूच ठेवले. त्यानंतर आवाजी मतदानाने ठराव संमत करण्यात आले. त्यापूर्वी भाजप सदस्यांनी सभात्याग केला. काही राज्यांमध्ये बंगाली भाषक स्थलांतरितांवरील कथित अत्याचाराबाबतच्या ठरावाची गरज काय? असा सवाल भाजपच्या अंगमित्रा पॉल यांनी विचारला. सत्तारूढ पक्ष याबाबत राजकारण करत असल्याचा आरोप त्यांनी केला. बाहेरील देशातून येणाऱ्या बंगाली हिंदूंनी चिंता करण्याची गरज नाही. केंद्राने नागरिकत्व सुधारणा कायदा लागू केल्याचे त्यांनी नमूद केले. या कायद्याला तृणमूल काँग्रेसचा विरोध असल्याचा दावा पॉल यांनी केला.मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या भाषणापूर्वी भाजप सदस्यांनी घोषणाबाजी केली. विरोधी पक्षनेते सुवेंदू अधिकारी यांचे २ सप्टेंबरला निलंबन करण्यात आले होते. त्याबाबतही भाजप सदस्यांनी घोषणा दिल्या. याला तृणमूल काँग्रेसच्या सदस्यांनी प्रत्युत्तर देत घोषणाबाजी केल्याने

### भाजप सदस्यांनी घोषणा दिल्या

मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या भाषणापूर्वी भाजप सदस्यांनी घोषणाबाजी केली. विरोधी पक्षनेते सुवेंदू अधिकारी यांचे २ सप्टेंबरला निलंबन करण्यात आले होते. त्याबाबतही भाजप सदस्यांनी घोषणा दिल्या. याला तृणमूल काँग्रेसच्या सदस्यांनी प्रत्युत्तर देत घोषणाबाजी केल्याने वातावरण चिघळले. विधानसभा अध्यक्ष बिमन बॅनर्जी यांनी भाजपचे मुख्य प्रतोद शंकर घोष यांना दिवसभरासाठी निलंबित केले.

वातावरण चिघळले. विधानसभा अध्यक्ष बिमन बॅनर्जी यांनी भाजपचे मुख्य प्रतोद शंकर घोष यांना दिवसभरासाठी निलंबित केले. घोष यांनी सदनातून बाहेर जाण्यास नकार दिल्याने सुरक्षारक्षकांकरवी त्यांना बाहेर नेण्यात आले. यावरून वाद अधिक वाढला. या गोंधळातच भाजपच्या अग्निमित्रा पॉल, मिहीर गोस्वामी, बंकिम घोष तसेच अशोक डिंडा या आमदारांना निलंबित करण्यात आले. दोन्ही बाजूंकडून घोषणाबाजी सुरू असल्याने सुरक्षारक्षक परिस्थिती हाताबाहेर जाऊ नये म्हणून खबरदारी घेत होते. भाजप मला का बोलू देत नाही? असा प्रश्न ममतांनी विचारला. अनेक वेळा तृणमूलचे सदस्य भाजप सदस्यांवर धावून गेले तेव्हा सुरक्षारक्षकांनी रोखले. या गोंधळात विधानसभा अध्यक्षांनी कामकाज सुरूच ठेवले. त्यानंतर आवाजी मतदानाने ठराव संमत करण्यात आले. त्यापूर्वी भाजप सदस्यांनी सभात्याग केला. काही राज्यांमध्ये बंगाली भाषक स्थलांतरितांवरील कथित अत्याचाराबाबतच्या ठरावाची गरज काय? असा सवाल भाजपच्या अंगमित्रा पॉल यांनी विचारला. सत्तारूढ पक्ष याबाबत राजकारण करत असल्याचा आरोप त्यांनी केला. बाहेरील देशातून येणाऱ्या बंगाली हिंदूंनी चिंता करण्याची गरज नाही. केंद्राने नागरिकत्व सुधारणा कायदा लागू केल्याचे त्यांनी नमूद केले.

# मणिपूरमध्ये शांततेसाठी करार

## मोदींच्या दौऱ्याच्या शक्यतेच्या पार्श्वभूमीवर घडामोडींना वेग

।नवी दिल्ली। वृत्तसंस्था : महाईन्यूज

**मणिपूरमध्ये कुकी आणि झो या गटांनी गुरुवारी केंद्र सरकारबरोबर गटांच्या सुरू असलेल्या कारवाया स्थगित करण्यासंबंधी (सस्पेंशन ऑफ ऑपरेशन्स, एसओओ) करार केला. नव्याने चर्चा करून करण्यात आलेल्या या करारानुसार मणिपूरचे भौगोलिक ऐक्य जपले जाणार असून, दीर्घकालीन शांततेसाठी उपाय शोधले जाणार आहेत. मणिपूरमध्ये शांतता प्रस्थापित करण्याच्या दृष्टिने हा करार महत्त्वाचा ठरणार आहे.**



पंतप्रधान नरेंद्र मोदी पुढील आठवड्यात मणिपूरला भेट देण्याची शक्यता आहे. त्या पार्श्वभूमीवर शांतता राखण्यासंबंधीच्या घडामोडींना वेग आला आहे. मोदींनी मणिपूरला भेट दिली, तर या ठिकाणी कुकी आणि मैतेयी गटांमध्ये हिंसाचार उफाळून आल्यानंतरची त्यांची ही पहिलीच भेट ठरेल. मणिपूरमधील घटनांवरून विरोधकांनी मोदी सरकारवर टीकेचा भडिमार केला होता.केंद्रीय गृह मंत्रालयाने या संदर्भात अधिकृत निवेदन प्रसिद्ध केले आहे. त्यानुसार केंद्रीय गृह मंत्रालय आणि कुकी गटातील चर्चेच्या अनेक फेऱ्यांनंतर या करारावर सही करण्यात आली. 'एसओओ' करार प्रथम २००८ मध्ये करण्यात आला. कराराचे सातत्याने नूतनीकरण करण्यात आले आहेफेब्रुवारी २०२४मध्ये त्याचे नूतनीकरण करण्यात आले नाही.'कुकी राष्ट्रीय संघटना' आणि 'युनायटेड पीपल्स फ्रंट' यांच्याबरोबर 'एसओओ' करार करण्यात आला. याखेरीज 'कुकी-झो परिषदे' दुसऱ्या क्रमांकाचा राष्ट्रीय महामार्ग नागरिक आणि आवश्यक वस्तूंची ने-आण करण्यासाठी खुला करण्याचा निर्णय घेतला आहे.

### हिंसेत २६० जणांचा मृत्यू

मणिपूर ३ मे २०२३ पासून हिंसेला तोंड देत आहे. मैतेयी समाजाने अनुसूचित जमातीमध्ये समावेश करावा, अशी मागणी केल्याने डोंगराळ भागातील कुकी समाजाने आंदोलन पुकारले होते. यादरम्यान झालेल्या हिंसेत दोन्ही समाजांतील आणि सुरक्षा दलांतील जवानांसह २६० जणांचा आतापर्यंत मृत्यू झाला आहे. मात्र, गेल्या काही महिन्यांत मणिपूरमध्ये शांतता आहे.



# गणेश उत्सव कसा साजरा करावा!

गणेश चतुर्थीला गणेशाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली जाते. श्री गणेशाच्या प्रतिष्ठापना विधीमध्ये गणपतीची मूर्तीचे आवाहन, स्नान, अभिषेक, वस्त्र, चंदन, फुल, पत्री, नैवेद्य इत्यादी सोळा उपचारांनी पूजा केली जाते. यामध्ये त्याला विविध एकवीस पत्री अर्पण केल्या जातात. त्यामध्ये फराळ आगळा यांची २१ जोडी गणपतीला अर्पण केली जाते. पावसाळ्यात या सर्व पत्रे सामान्यता उपलब्ध असतात आणि प्रत्येक वनस्पतीला काही औषधी गुणधर्म सुद्धा आहेत. मूर्तीचे विसर्जन करण्यापूर्वी तिची उत्तर पूजा करतात. मूर्तीचे विसर्जन करण्यापूर्वी काही मंत्रही म्हणतात. जिथे गणपती बसवायचा असतो, तेथे मखर किंवा विविध साधनांनी सजावट केली जाते, लाइटिंग लावली जाते, गणपतीला वेगवेगळ्या पदार्थांचा नैवेद्य दररोज दिला जातो. लाडू व मोदक यांचा भोग लावल्या जातो. तसेच गणपतीची नावे वेगवेगळी आहेत. भाद्रपद शुद्ध चतुर्थीला गणेश उत्सव साजरा केला जातो. एका मान्यतेनुसार श्रीगणेशाच्या अवतारांपैकी गणेश यांचा जन्म व भाद्रपद शुद्ध चतुर्थीला महादेव शिवशंकरांनी कैलास पर्वतावर भाद्रपद शुद्ध चतुर्थीला याच दिवशी जन्मोत्सव साजरा केला. श्रीगणेश यांनी शिंदूर दैत्यावर विजय मिळवला. तो दिवस भाद्रपद शुद्ध चतुर्थी हा होता. त्यामुळे हा उत्सव साजरा करण्यात आला ती पूर्व परंपरा आजही पाळली जाते. चतुर्थी श्री गणेशाची अत्यंत प्रिय तिथी आहे. चतुर्थी म्हणजे जागृती स्वप्न सुशुप्ती या पलिकडील अवस्था आहे. गणेश चतुर्थीचा उत्सव सार्वजनिक रित्या शनिवार वाड्यात सुरू केला गेला. व हा मोठ्या श्रद्धेने व उत्साहाने साजरा केला जातो.

# गणेश उत्सव विषयी पौराणिक कथा!

शिवपुरानाध्ये गणपती विषयीचा एक उल्लेख आढळतो. त्यामध्ये पार्वती एके दिवशी नंदीला द्वारपाल म्हणून नियुक्त करून स्नान करण्यास गेलीअसता यावेळी शंकर तेथे आले. त्यांनी नंदीस झुगारून न्हाणीघरात प्रवेश केला. यामुळे पार्वती अपमानित व रागाने क्षुब्ध झाली. शेवटी सखी जया व विजया यांच्या सल्ल्याने चिखलापासून एका सुंदर पुत्राची मूर्ती तिने निर्माण केली व त्यात प्राण फुंकले या पुत्रास तिने स्वतःचा अनुचर म्हणून नेमले नंतर एकेदिवशी या कुमार मुलास दारी नेमून पार्वती स्नानास गेली असता, शंकर तेथे उपस्थित झाले. यावेळी त्या कुमाराने शंकरास अडवले. पहिल्यांदा कुमारसोबत त्यांचा वाद व नंतर पार्वतीच्या मनातील रागाप्रमाणे युद्ध झाले. शिव व सर्व देवतागण या लढाईत पराजित झाले. तेव्हा नारदाच्या सल्ल्याने विष्णूद्वारे कुमारास मोहित करून शंकरांनी त्याचे मुंडके उडविले ही वार्ता ऐकून पार्वतीने क्रुद्ध होऊन सृष्टी नष्ट करण्यास प्रारंभ केला. नारद व देवगणांनी पार्वतीला शांत केले. तेव्हा पार्वतीने तिच्या पुत्राच्या पुनर्जीवनाची मागणी केली व तिचा पुत्र सगळ्यांना पूज्य व्हावा, अशी इच्छा व्यक्त केली. शंकरांनी त्यास होकार दिला. परंतु कुमाराचे मस्तक कोठेही न मिळाल्याने त्यांनी गणांस उत्तर दिशेस पाठवले व प्रथम जो प्राणी दिसेल त्याचे मस्तक आणण्याची आज्ञा केली. एका हत्तीचे मस्तक घेऊन उपस्थित झाले. देवगणांनी ह्या मुंडक्याच्या साहाय्याने कुमारास जिवंत केले. तर प्रांत शंकरांनी या मुलास स्वपुत्र म्हणून स्वीकारले व देवगण यांच्या आशिर्वादाने हा मुलगा पूज्य झाला व श्री गणेश नावाने प्रसिद्ध झाला. तसेच आणखीन एक गणपती विषयी अख्यायिका आहे. एकदा गणपती चतुर्थीचे स्वतःचे आवडीचे मोदक खाऊन उंदराच्या पाठीवरून जात होता. वाटेत साप दिसल्याने उंदिर भयाने कापू लागला. यामुळे गणपती उंदराच्या पाठीवरून खाली पडला व त्याचे पोट फाटून मोदक बाहेर पडले. गणपतीने ते सारे मोदक पुनः पोटात टाकले व पोटावर साप बांधला. हे दृश्य पाहून आकाशातील चंद्र हसू लागला. म्हणून तुझ्या रूपास चतुर्थीस कोणी दर्शन घेणार नाही. जो तुझे रूप पाहिल त्याचावर संकट येईल. असा शाप चंद्राला दिला, अशीही एक आख्यायिका प्रसिद्ध आहे.



हुक्का पार्टी

## एस ओपनमधील माहीचा फोटो होतोय व्हायरल

# धोनी आणि जोकोविचची हुक्का पार्टी!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**एम एस धोनी आणि हुक्का हा सोशल मीडियावर चर्चेचा विषय झाला आहे. इरफान पठाणने केलेल्या वक्तव्यामुळे हुक्का आणि धोनी चर्चेत आलं आहे. यादरम्यान धोनी युएस ओपनचा सामना पाहण्यासाठी पोहोचल्याचे फोटो व्हायरल होत आहेत. यूएस ओपन २०२५मधील नोवाक जोकोविचचा सामना पाहण्यासाठी धोनीने हजेरी लावली होती.**

## चाहत्यांच्या भन्नाट प्रतिक्रिया




दरम्यान चाहत्यांनी या फोटोसह धोनी युएस ओपन २०२५ चा उपांत्य फेरीचा सामना पाहताना दिसला. या सामन्यात जगातील सातव्या क्रमांकाचा खेळाडू नोवाक जोकोविचने टेलर फ्रिट्झचा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला. उद्योगपती हितेश संघवी यांनी त्यांच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर धोनीबरोबरचा एक फोटो आणि जोकोविचच्या सामन्याची क्लिप शेअर केली. या क्वार्टरफायनल सामन्यात जोकोविचने फ्रिट्झचा ६-३, ७-५, ३-६, ६-४ असा पराभव केला.जोकोविचने या हंगामात चारही प्रमुख स्पर्धांमध्ये किमान उपांत्य फेरी तरी गाठली आहे. उपांत्य फेरीत त्याचा सामना कार्लोस अल्काराझशी होईल, ज्याला त्याने गेल्या वर्षी पॅरिस ऑलिम्पिकमध्ये पराभूत करत सुवर्णपदक जिंकले होते. त्यानंतर या वर्षी जानेवारीमध्ये तो ऑस्ट्रेलियन ओपनच्या क्वार्टर फायनलमधून बाहेर पडला. जोकोविचचा २२ वर्षीय खेळाडूविरुद्ध ५-३ असा विक्रम आहे.दरम्यान धोनीसह नोवाक जोकोविचचा एक फोटोही व्हायरल होत आहे. यावर चाहत्याने धोनी आणि नोवाक जोकोविच सामना संपल्यानंतर एकत्र हुक्का पार्टी केल्याचं म्हटलं आहे. तर चाहत्यांनीदेखील या फोटोवर एकापेक्षा एक प्रतिक्रिया दिल्या आहेत. धोनी आणि नोवाकचा फोटो शेअर करत चाहत्याने या फोटोला कॅप्शन दिलं आहे. तर चाहत्यांनी धोनीच्या या फोटोंवर कमेंट्सचा पाऊस पडला आहे.याचबरोबर धोनी सध्या युएसमध्ये सुट्ट्यांचा आनंद घेत असल्याच्या पोस्टदेखील समोर येत आहेत. दरम्यान धोनी पुढील वर्षी आयपीएलमध्ये खेळताना दिसणार की नाही, याबाबत प्रश्नचिन्ह आहे.

धोनीचं वय आणि त्याचा फिटनेस पाहता धोनीने देखील याबाबत स्पष्ट उत्तर दिलेलं नाही. धोनीने अद्याप आयपीएलमधून निवृत्तीची घोषणा केलेली नाही. आयपीएल २०२५ मध्ये महेंद्रसिंग धोनीची कामगिरी खूपच साधारण राहिली होती. या हंगामात त्याने १४ सामने खेळले. यामध्ये त्याने २४.५० च्या सरासरीने फक्त १९६ धावा केल्या. याशिवाय, चेन्नई सुपर किंग्जची कामगिरीही खूपच खराब होती आणि संघ गुणतालिकेत तळाशी होता. दरम्यान चाहत्यांनी या फोटोसह धोनी युएस ओपन २०२५ चा उपांत्य फेरीचा सामना पाहताना दिसला. या सामन्यात जगातील सातव्या क्रमांकाचा खेळाडू नोवाक जोकोविचने टेलर फ्रिट्झचा पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला. उद्योगपती हितेश संघवी यांनी त्यांच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर धोनीबरोबरचा एक फोटो आणि जोकोविचच्या सामन्याची क्लिप शेअर केली. या क्वार्टरफायनल सामन्यात जोकोविचने फ्रिट्झचा ६-३, ७-५, ३-६, ६-४ असा पराभव केला.जोकोविचने या हंगामात चारही प्रमुख स्पर्धांमध्ये किमान उपांत्य फेरी तरी गाठली आहे. उपांत्य फेरीत त्याचा सामना कार्लोस अल्काराझशी होईल, ज्याला त्याने गेल्या वर्षी पॅरिस ऑलिम्पिकमध्ये पराभूत करत सुवर्णपदक जिंकले होते. त्यानंतर या वर्षी जानेवारीमध्ये तो ऑस्ट्रेलियन ओपनच्या क्वार्टर फायनलमधून बाहेर पडला. जोकोविचचा २२ वर्षीय खेळाडूविरुद्ध ५-३ असा विक्रम आहे.दरम्यान धोनीसह नोवाक जोकोविचचा एक फोटोही व्हायरल होत आहे. यावर चाहत्याने धोनी आणि नोवाक जोकोविच सामना संपल्यानंतर एकत्र हुक्का पार्टी केल्याचं म्हटलं आहे. तर चाहत्यांनीदेखील या फोटोवर एकापेक्षा एक प्रतिक्रिया दिल्या आहेत. धोनी आणि नोवाकचा फोटो शेअर करत चाहत्याने या फोटोला कॅप्शन दिलं आहे.

### धोनीच्या फोटोंवर कमेंट्सचा पाऊस

तर चाहत्यांनी धोनीच्या या फोटोंवर कमेंट्सचा पाऊस पाडला आहे.याचबरोबर धोनी सध्या युएसमध्ये सुट्ट्यांचा आनंद घेत असल्याच्या पोस्टदेखील समोर येत आहेत. दरम्यान धोनी पुढील वर्षी आयपीएलमध्ये खेळताना दिसणार की नाही, याबाबत प्रश्नचिन्ह आहे. धोनीचं वय आणि त्याचा फिटनेस पाहता धोनीने देखील याबाबत स्पष्ट उत्तर दिलेलं नाही.

# आशिया चषकासाठी युएईचा संघ जाहीर

## भारतीय वंशाच्या बऱ्याच खेळाडूंचा समावेश; कर्णधार पाकिस्तानचा खेळाडू

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आशिया चषक २०२५ येत्या ९ सप्टेंबरपासून सुरू होणार आहे, यावेळी ही स्पर्धा टी-२० स्वरूपात खेळवली जाईल. यावेळी एकूण ८ संघ आशिया चषकात खेळताना दिसणार आहेत. या ८ संघांची विभागणी दोन गटांमध्ये केली जात आहे. आता युएईच्या संघाने आपला संघ जाहीर केला आहे. ज्यामध्ये अनेक भारतीय वंशाचे खेळाडूदेखील आहेत. आणि पाकिस्तानी वंशाच्या खेळाडूंनाही संधी देण्यात आली आहे.**



युएईच्या संघात १७ खेळाडूंना संधी देण्यात आली आहे. या संघाच्या नेतृत्त्वाची जबाबदारी मोहम्मद वसीमच्या खांद्यावर दिली आहे. मोहम्मद वसीम हा पाकिस्तानचा खेळाडू आहे. तर भारतीय वंशाचे ४-५ खेळाडू संघात आहेत.युएईने आशिया चषकामध्ये जाहीर केलेल्या संघामध्ये वेगवान गोलंदाज मतिउल्लाह खान आणि डावखुरा फिरकी गोलंदाज सिमरनजीत सिंग या दोन खेळाडूंचे पुनरागमन झालं आहे.

या दोन्ही खेळाडूंना यूएईमध्ये खेळल्या जाणाऱ्या तिरंगी मालिकेसाठी संघात स्थान देण्यात आले नव्हते, परंतु या दोन्ही खेळाडूंची आशिया चषकासाठी निवड झाली आहे. युएई संघ ९ वर्षांनंतर आशिया चषकामध्ये सहभागी होणार आहे.घरच्या मैदानावर खेळल्या जाणाऱ्या या स्पर्धेत, यूएईला त्यांच्या खेळाडूंकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा असेल, ज्यामध्ये बहुतेकांच्या नजरा गोलंदाजीत जुनैद सिद्दीकीवर असतील. यूएई संघ भारत, पाकिस्तान आणि ओमानसह अ गटात आहे, ज्यामध्ये त्यांना त्यांचा पहिला सामना १० सप्टेंबर रोजी दुबईच्या मैदानावर भारतीय संघाविरुद्ध खेळायचा आहे.

### भारतीय वंशाचे खेळाडू

युएईच्या संघात भारतीय वंशाचे काही खेळाडू आहेत. यामध्ये हर्षित कौशिक, सिमरनजीत सिंग, ध्रुव पराशर, आर्यंश शर्मा, अलिशन शरफु हे खेळाडू भारतीय वंशाचे आहेत. ध्रुव पराशर याचा जन्म पुण्यातील आहे, तर अलिशन शरफु याचा जन्म तिरूवअनंतपुरम येथील आहे.यानंतर, यूएई संघ १५ सप्टेंबर रोजी दुसऱ्या सामन्यात ओमान संघाविरूद्ध भिडताना दिसणार आहे.

स्मार्ट PCMC
महाईन्यूज ™
ePaper
epaper.mahaenews.com
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती
। शुक्रवार ।
। दि. 5 सप्टेंबर 2025।

## विद्यार्थ्यांचा सहभाग, शिक्षकांची उत्स्फूर्तता

# मास्टर माईंड ग्लोबल स्कूलमध्ये गणेशोत्सव उत्साहात साजरा

### शिक्षण विश्व: ढोलताशांच्या गजरात बाप्पाला निरोप

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**मास्टर माईंड ग्लोबल स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजमध्ये यंदाही गणेशोत्सव पारंपरिक पद्धतीने आणि मोठ्या भक्तिभावात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांचा सहभाग, शिक्षकांची उत्स्फूर्तता आणि संस्थेच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती यामुळे संपूर्ण परिसर उत्साही वातावरणात न्हाऊन निघाला.**



दरवर्षीप्रमाणे यावर्षीही शाळेच्या आवारात गणपती बाप्पाची स्थापना करण्यात आली होती आणि भक्तिभावपूर्ण पूजनानंतर बाप्पाचे विसर्जन ढोलताशांच्या गजरात करण्यात आले.

विसर्जनाच्या दिवशी शाळेत विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यानिमित्ताने सत्यनारायण महापूजाही पार पडली. या महापूजेसाठी संस्थेच्या संस्थापिका जयश्री गवळी उपस्थित होत्या. त्यांच्यासोबतच शाळेच्या मुख्याध्यापिका डॉ प्रदीपा नायर आणि प्रशासक मनीकंदन नायर यांचीही विशेष उपस्थिती लाभली. या कार्यक्रमात शिक्षकांच्या गटांमध्ये नृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. सर्व शिक्षकांनी सहभाग घेत विद्यार्थ्यांप्रमाणेच आपली कला सादर करत कार्यक्रमाची शोभा वाढवली.

विद्यार्थ्यांनी गणेशाच्या विविध नामांविषयी माहिती देणारे नाट्य सादर केले. यासोबतच निनाद ढोल ताशा पथकाने देखील आपले वादन सादर करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. ढोल ताशांच्या तालावर शिक्षक आणि विद्यार्थी दोघांनीही उत्साहाने सहभाग घेतला. संपूर्ण परिसर ढोलताशांच्या निनादात दुमदुमला होता. अखेर सर्वांनी "गणपती बाप्पा मोरया पुढच्या वर्षी लवकर या" असा गजर करत आपल्या लाडक्या बाप्पाला भावपूर्ण निरोप दिला. मास्टर माईंड ग्लोबल स्कूलमधील हा पारंपरिक आणि सांस्कृतिक उत्सव विद्यार्थ्यांमध्ये एकात्मता, भक्ती आणि संस्कृतीची जागरूकता निर्माण करणारा ठरला.

---

## थेरगाव न्यू इंग्लिश स्कूलची क्रीडा स्पर्धेत धमाकेदार कामगिरी

### शिक्षण विश्व: जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत 5 पदकांची कमाई

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**सध्या पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि पुणे जिल्हा क्रीडा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शालेय क्रीडा स्पर्धांमध्ये न्यू इंग्लिश मिडियम स्कूल, थेरगाव शाळेने आपली चमकदार उपस्थिती नोंदवली आहे. शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रातही शाळेने भक्कम पाऊल टाकत जिल्हास्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत एक रोप्य आणि चार कास्यपदकांची कमाई करत शानदार यश संपादन केले.**



या स्पर्धेत पृथ्वी रोडे हिने रोप्य पदक पटकावले. तर श्याम माळी, धनराज जाधव, असावरी राऊत आणि भाग्यश्री गायकवाड यांनी अनुक्रमे कास्यपदके जिंकत शाळेच्या नावलौकिकात भर घातली आहे. शाळेतील विद्यार्थी केवळ बॉक्सिंगपुरतेच मर्यादित न राहता जुडो, युनिफाईट, किक बॉक्सिंग, थाई बॉक्सिंग, कबड्डी, खो-खो, बुद्धिबळ, डॉजबॉल यांसारख्या विविध खेळांमध्येही उत्स्फूर्तपणे सहभाग घेत आहेत. खेळाप्रती असलेली विद्यार्थ्यांची निष्ठा आणि संस्थेचे अध्यक्ष व राष्ट्रीय स्तरावरील माजी खेळाडू श्री. विजय पवार सर यांचे सातत्याने मिळणारे मार्गदर्शन यामुळे विद्यार्थ्यांचे प्रदर्शन सातत्याने उंचावत आहे. याच मार्गदर्शनाचा लाभ घेत आजवर अनेक विद्यार्थी विभागीय, राज्यस्तरीय व राष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धांमध्ये यश मिळवू शकले आहेत.या यशानंतर विजेत्या तसेच सहभागी सर्व खेळाडूंना संस्थेचे अध्यक्ष श्री. विजय पवार, सचिव श्री. अशोक मोरे, खजिनदार सौ. सुरेखा पवार, मुख्याध्यापिका सौ. विद्या नाईक, सौ. अग्निस मॅडम, सर्व सन्माननीय पदाधिकारी, शिक्षकवृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी शुभेच्छा दिल्या. या संपूर्ण यशामध्ये शाळेचे क्रीडा शिक्षक माने यांचे मार्गदर्शन मोलाचे ठरले आहे.


College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.
PDEA
Pharmacy Council of India
SPPU Affiliation
A NAAC
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education
Facilitation & Verification Center for
F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and
Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26
Admission Schedule for
F.Y.B.Pharm
Online Registration & Document Upload
07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM)
Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC)
08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Display of Provisional Merit List
25 July 2025
Grievance Submission (Online / at FC)
26 – 28 July 2025 (10:00AM-5:00 PM)
Final Merit List
31 July 2025
Your Trusted Facilitation Centre!
FC Code 6372
Important Note:
• Bring all original + Xerox copies of documents
• Late registrations after 14 July are for Non-CAP seats only
"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"
Confirm
Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad

## महाराष्ट्रात केवळ मोजक्या प्राचीन स्थळी आढळतात अशा मूर्ती

# भुलेश्वरात दर्शन घडतेय 'विनायकी'चे! शिल्प अभ्यासकांसाठी महत्त्वाचे केंद्र!

## गणेशोत्सव विशेष: स्त्रीरूपातील श्रीगणेशाचं दुर्मिळ आणि अद्‌भुत रूप

।पुरंदर।
विजयकुमार हरिश्चंद्रे : महाईन्यूज





**महाराष्ट्राच्या संस्कृतीत गणेशपूजेचं विशेष स्थान आहे, परंतु जयाद्री खोऱ्यातील पुरंदर तालुक्यात असलेल्या प्राचीन भुलेश्वर मंदिरात आजही दर्शन घडतंय एका अद्वितीय आणि दुर्मिळ स्वरूपाचं — स्त्रीरूपी श्री गणेश, ज्याला "विनायकी" म्हणून ओळखलं जातं. गणेशाचं हे स्त्री रूप शिल्पस्वरूपात फारच दुर्मिळ आहे. महाराष्ट्रात केवळ मोजक्या प्राचीन स्थळी अशा मूर्ती आढळतात — त्यातील भुलेश्वरचं स्थान विशेष आहे. सप्तमातृका शिल्प समूहात वैनायकीचं (स्त्री गणेश) अस्तित्व स्पष्टपणे दिसून येतं. पद्मासनात बसलेली ही वैनायकी शिल्पमूर्ती सालंकृत असून तिच्या पायाशी मूषक हे वाहन कोरलेलं आहे, जे गणेशाची ओळख पटवून देतं.**









शिल्पशास्त्र आणि पुराणांनुसार, वैनायकी या सप्तमातृकांपैकी एक मानली गेली असून तिचा उल्लेख स्कंद पुराण व देवीसहस्रनामात "विनायकी", "लंबोधरी" आणि "गणेश्वरी" अशा विशेषणांनी आढळतो. गुप्तकालीन आणि मध्ययुगीन शक्तीपूजन परंपरेत वैनायकीचं महत्व लक्षणीय होतं. ओरिसा, त्रिपुरा आणि संभाजीनगरच्या वेरूळ लेणींप्रमाणे भुलेश्वरही शिल्पशैलीचा उत्कृष्ट नमुना मानलं जातं. मंदिराच्या भिंतींवर कोरलेली कुंभ, कमळ, देवी-देवतांचे युद्ध प्रसंग, रामायण-महाभारतातील दृष्पट, वन्यजीव व पक्ष्यांची शिल्पं हे येथील वैशिष्ट्य आहे.

भुलेश्वर मंदिर आज केवळ धार्मिक स्थळ नाही, तर ते भारतीय आणि विदेशी शिल्प अभ्यासक, इतिहासप्रेमी आणि विद्यार्थ्यांसाठी अभ्यासाचे एक महत्त्वाचे केंद्र बनले आहे. भारतीय पुरातत्व विभागाने या मंदिराचा संरक्षित स्मारक म्हणून घोषित करून या ऐतिहासिक वारशाचं जतन केलं आहे. ही सांस्कृतिक आणि अध्यात्मिक संपत्ती महाराष्ट्राच्या प्राचीन समृद्धतेचं प्रतीक आहे आणि गणेशाच्या स्त्री रूपातल्या या वैनायकीचं दर्शन भक्तांसाठी एक दुर्लभ आध्यात्मिक अनुभव आहे.

**'वैनायकी' स्वरूप हे त्या समतेचं आणि समग्रतेचं प्रतिक...**

भुलेश्वरातील वैनायकी हे शिल्प स्पष्टपणे दर्शवतं की, आपली प्राचीन संस्कृती स्त्री-पुरुष रूपांमध्ये देवत्वाचा भेद करत नव्हती. आज आपण ज्या देवतांना एकल रूपात ओळखतो, त्या अनेकदा दैवी शक्तींच्या युग्म स्वरूपात होत्या – शिवशक्ती, लक्ष्मीनारायण यांसारख्या. गणेशाचंही वैनायकी स्वरूप हे त्या समतेचं आणि समग्रतेचं प्रतीक आहे. वैनायकी शिल्प म्हणजे केवळ मूर्ती नाही – ती आहे स्त्रीशक्तीच्या गणेशत्वाशी झालेल्या एकात्मतेची साक्ष. त्याचं वाहन मूषक असणं, चार हातांत आयुधं असणं, आणि एकूण स्वरूपाने गणेशाशी साम्य असणं हे दाखवून देतं की देवीत्व केवळ लिंगावर आधारलेलं नाही, तर ते तत्त्व आहे – बुद्धी, शक्ती आणि करुणेचं. आजच्या काळात, जेव्हा स्त्रीसमानतेवर चर्चा केली जाते, तेव्हा अशा विस्मरणात गेलेल्या शिल्पांच्या आणि संकल्पनांच्या आठवणी आपल्याला आपल्या मूळ तत्त्वज्ञानाकडे परत नेतात. सांस्कृतिक स्मृती आणि ऐतिहासिक ज्ञान जपणं हे केवळ पुरातत्त्वाचा भाग नाही, तर एक सामाजिक जबाबदारी आहे.

# वाडा संस्कृतीचे गौराई सजावटीतून दर्शन



भोर शहर पंचक्रोशीतील कुडपणे गावातील सुरेंद्र कुडपणे आणि परिवाराने आपली वाडा संस्कृती दर्शवत गौराई सजावट केली त्याचे सर्वत्र कौतुक होतंय



जेजुरीतील अदिती आगलावे यांच्या घरातील आकर्षक गौरी सजावट


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046

# महाईन्यूज

ePaper

। शुक्रवार ।
। दि. 5 सप्टेंबर 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती


